## माहिती तंत्रज्ञान अधिनियम-२००० (सुधारणा २००८)

**Information Technology Act 2000 (Ammendment - 2008)**

**उद्देश :**

- विद्युत व्यापाराला (Electronic commerce) कायदेशीर मान्यता देणे
- संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने 30 जानेवारी 1997 रोजी 'इलेक्ट्रॉनिक व्यवहारावरील (व्यापार) प्रारुप कायदा' स्वीकारण्याचा ठराव केला.

### प्रकरण 1

**प्रारंभिक**

**कलम 1 : संक्षिप्त शीर्षक, विस्तार**

- संपूर्ण भारताला लागू
- भारताबाहेर केलेल्या अपराधाला सुद्धा लागू
- पुढील कायद्यांना लागू नाही

(a) Negotiable Instrument Act, Section 13
(b) Power of attorney Act, Section 1 (A)
(c) Indian Trust Act, Section 3
(d) Indian Succession Act, Section 2 (h)
(e) स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाविषयीचे करार

**कलम 2 : व्याख्या**

### प्रकरण 2

**अंकात्मक स्वाक्षरी**
**(Digital Signature)**

**कलम 3 :** कोणताही वर्गणीदार विद्युत नोंदीना, अंकात्मक स्वाक्षरीची जोड देऊन विश्वसनीय बनवू शकतो

- विद्युत नोंदीचे अधिप्रमाण "Asymmetric crypto system" आणि "Hashfunction" द्वारे करण्यात येते.

### प्रकरण 3

**इलेक्ट्रॉनिक शासन व्यवहार**
**(Electronic Governance)**

**कलम 4 :** लेखी स्वरुपात पुरवला जाणारा विषय ''विद्युत नोंदीद्वारे'' पुरवल्यास तो कायदेशीर असेल

**कलम 5 :** अंकात्मक स्वाक्षरीच्या आधारे अधिकृत केलेली माहिती विश्वसनीय मानली जाईल.

**कलम 6 :** शासन व तिच्या नामांकरणामध्ये 'विद्युत अभिलेखाचा' आणि 'अंकात्मक स्वाक्षरीचा' वापर कायदेशीर असेल

**कलम 7 :** कागदपत्रे, नोंदी, माहिती इ.विद्युत अभिलेखाच्या स्वरुपात ठेवता येतील.

**कलम 8 :** नियम, नियमने इ. वगैरे विद्युत राजपत्रात प्रकाशित करता येतील

**कलम 9 :** कलम 6, 7 आणि 8 कोणत्याही व्यक्तीला, कागदपत्र विद्युत स्वरुपामध्ये स्वीकारली जावीत यासाठी आग्रह धरण्याचा हक्क देत नाही.

**कलम 10 :** अंकात्मक स्वाक्षरीसंदर्भात केंद्र सरकारला नियम बनविण्याचा अधिकार
उदा. त्याची जोडणी, प्रकार व इतर कार्यपद्धती

### प्रकरण 4

**विद्युत अभिलेखांचे आरोपण (Attribution), अभिस्वीकृती (Acknowledgement) व पाठवणी (Dispatch)**

**कलम 11 :** ज्या प्रेषिताने (Originator) किंवा ज्याच्या वतीने विद्युत नोंदी पाठवली असेल त्याला बहालत्व (Attribution) दिले जाईल

**कलम 12 :** पोचपावती (Acknowledgement)

- प्रेषित (Originator) सहमत असलेल्या मार्गाने

प्रेषितीने (Addressee) पोचपावती द्यावी

**कलम** 13 : विद्युत अभिलेख पाठवण्याचे आणि प्राप्तीचे वेळ व ठिकाण

- प्रेषिताच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या संगणक स्त्रोतामध्ये प्रवेश केल्यानंतर तो पाठवण्यात आला असे मानले जाईल.
- विद्युत नोदी प्राप्त करण्याच्या हेतूने प्रेषिताने संगणक साधनमार्ग जर स्पष्ट दर्शवला तर, विद्युत नोदी प्राप्त झाल्याची वेळ मानली जाईल.

## प्रकरण 5

### विद्युत अभिलेख आणि अंकात्मक स्वाक्षरीची सुरक्षा

**कलम** 14 : जेव्हा एखाद्या विद्युत अभिलेखाला कोणतीही सुरक्षित कार्यपद्धती लागू असते, त्यावेळी आशा वेळेपासून ते पडताळणीच्या वेळेपर्यंत असे अभिलेख हे सुरक्षित अभिलेख मानले जाईल.

**कलम 15 : अंकात्मक स्वाक्षरीची सुरक्षा**

- संबंधित पक्षकारांची सुरक्षित कार्यपद्धतीबाबत अर्जाद्वारे सहमती असल्यास, तिच्या जोडणीच्या (affix) वेळी अंकात्मक स्वाक्षरी पडताळली जाईल.

**कलम** 16 : केंद्र सरकार सुरक्षित कार्यपद्धती नमूद करु शकेल. उदा. व्यवहाराचे स्वरुप, खर्च इ.

## प्रकरण 6

### प्रमाणपत्र देणाऱ्या अधिसत्तेचे नियमन

### (Regulation of Certifying Authority)

**कलम** 17 : केंद्र सरकार प्रमाणपत्र देणाऱ्या अधिसत्तेच्या नियंत्रकाची तसेच उप/सहाय्यक नियंत्रकाची नियुक्ती करु शकेल.

**कलम 18 : नियंत्रकांची कार्ये**

प्रमाणपत्र देणाऱ्या अधिसत्तेवर नियंत्रण ठेवणे तसेच त्यांची पात्रता, अनुभव नमूद करणे इ.

**कलम** 19 : केंद्र सरकारच्या सहमतीने, नियंत्रक प्रमाणपत्र जारी करण्यासाठी विदेशी प्रमाणन अधिसत्तेला मान्यता देवू शकेल.

**कलम** 20 : नियंत्रक हा सर्व अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्रांचा संग्रहस्थान (repository) म्हणून कार्य करेल.

**कलम** 21 : कोणताही व्यक्ती अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्र जारी करण्याचा परवाना मिळण्याबाबत नियंत्रकाकडे अर्ज पाठवू शकतो.

- असा परवाना नमूद केलेल्या कालावधीपुरताच वैध असेल
- तो अहस्तांतरणीय असेल, अनुवांशिक नसेल

**कलम** 22 : केंद्र सरकारने नमूद केल्याप्रमाणे विशिष्ट नमून्यात, आवश्यक कागदपत्रासह, जास्तीत जास्त 25,000 फी भरुन परवान्यासाठी अर्ज करावा.

**कलम** 23 : परवाण्याच्या नुतनीकरणासाठी अर्ज

- मुदत संपण्यापूर्वी 45 दिवसाच्या आत
- फी 5,000 रुपयांपर्यंत

**कलम** 24 : नियंत्रक कागदपत्रे व इतर घटकाच्या आधारे परवाना संमत करेल किंवा नाकारेल

**कलम** 25 : परवान्याची तहकूबी (suspension)

- अटी व शर्तीचे पालन न केल्यास
- मात्र संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी न देता 10 दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी तो तहकूब करता येणार नाही.

**कलम** 26 : नियंत्रक परवान्याच्या तहकूबीची किंवा रद्दबातलीकरणाची नोटीस संबंधित व्यक्तीला देईल.

**कलम** 27 : नियंत्रक आपल्या अधिकाराचे प्रदत्तीकरण उप/सहाय्यक नियंत्रकाला करु शकेल.

**कलम** 28 : नियंत्रक नियम, कायदा इ. च्या उल्लंघनाची चौकशी करु शकेल

- त्याला आयकर अधिनियम 1961 अंतर्गत अधिकार असतील.

**कलम 29 :** नियंत्रकाला संगणक आणि माहितीचा साठा यामध्ये प्रवेश करण्याचा अधिकार

- कायदा, नियम इ. चे उल्लंघन झाल्यास

**कलम 30 :** प्रमाणन अधिसत्तेने (Certified authority) ठराविक कार्यपद्धतीचा अवलंव करणे
उदा. सुरक्षा व गुप्तता राखणारी कार्यपद्धत

**कलम 31 :** प्रमाणन अधिसत्तेने कायदे पालनाची हमी देणे

**कलम 32 :** प्रमाणन अधिसत्तेने परवाना व्यवसाय चालवित असलेल्या परिसरात चटकन लक्षात येईल अशा ठिकाणी परवाना प्रदर्शित करावा.

**कलम 33 :** परवाना रद्द किंवा तहकूब झाल्यानंतर, प्रमाणन अधिसत्तेने तो नियंत्रकाकडे जमा करावा

**उल्लंघन :** 6 महिन्यापर्यंत / 10,000 पर्यंत / दोन्ही

**कलम 34 :** कायदेशीर पद्धतीद्वारेच अधिसत्तेने प्रगटीकरण (disclosure) करावे.
उदा. प्रमाणपत्र रद्द किवा निलंबन करण्याबाबतची नोटीस

## प्रकरण 7

### अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्र
### (Digital Signature Certificate)

**कलम 35 :** केंद्र सरकारने नमूद केलेल्या नमुन्यात कोणतीही व्यक्ती प्रमाणपत्रासाठी अधिसत्तेकडे अर्ज करु शकते. (फी 25,000 रुपयांपर्यंत)

**कलम 36 :** अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्र जारी करताना अधिसत्तेने खालील बाबी प्रमाणित कराव्यात

(a) प्रमाणपत्र विश्वसनीय व्यक्तीला उपलब्ध करुन दिले आहे.

(b) वर्गणीदाराच्या 'सार्वजनिक' आणि 'खाजगी चावी' ह्या 'कार्यात्मक चावी जोड' स्थापित करतात.

**कलम 37 :** अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्राची तहकूबी (Suspension)

- वर्गणीदार किंवा त्याच्या वतीने विनंती आल्यास,
- बाजू मांडण्याची संधी न देता 15 दिवसापेक्षा अधिक काळ तहकूब करता येणार नाही.

**कलम 38 :** प्रमाणन अधिसत्ता खालील परिस्थितीत अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्राचे रद्दबातलीकरण करु शकते.

- वर्गणीदार किंवा तिच्या वतीने विनंती केल्यास
- वर्गणीदाराचा मृत्यु
- वर्गणीदार फर्म किंवा कंपनी असल्यास, फर्मच्या आशा ठरावावर किंवा कंपनी बंद झाल्याने
- इतर कायदेशीर बाबींचे उल्लंघन केल्यास

**कलम 39 :** प्रमाणन अधिसत्तेने प्रमाणपत्र तहकूब किंवा रद्दबातद झाल्याची नोटीस प्रकाशित करावी.

## प्रकरण 8

### वर्गणीदाराची कर्तव्ये

**कलम 40 :** जोड चावीची निर्मिती (generating key pairs)

- स्वाक्षरी प्रमाणपत्रात नमूद असणारी आशी सार्वजनिक चावी की जी, वर्गणीदाराच्या खाजगी चावीशी साम्य राखते
- वर्गणीदार अशा चावीची जोडी (key pair) उत्पन्न करु शकतो.

**कलम 41 :** खालील परिस्थितीत वर्गणीदाराने अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्राचा स्वीकार केला असे मानले जाईल

- जेव्हा तो प्रमाणपत्र प्रकाशित करेल
- त्याने प्रकाशनाचे अधिकार एक किंवा अधिक व्यक्तींना दिले.
- प्रमाणपत्राला आपली संमती दशविली.

**कलम 42 :** खाजगी चावीचे नियंत्रण करण्याची जबाबदारी प्रत्येक वर्गणीदारावर असेल

- वर्गणीदाराच्या अंकात्मक स्वाक्षरी जोडण्याचा अधिकार नसलेल्या व्यक्तीला ती उघडण्यापासून प्रतिबंध करणे.
- खाजगी चावी धोक्यात आली असल्यास वर्गणीदाराने ही माहिती विनाविलंब अधिसत्तेला कळवावी.
- खाजगी चावी धोक्यात आल्याची माहिती अधिसत्तेला कळवेपर्यंत वर्गणीदाराला जबाबदार समजले जाईल.

## प्रकरण 9

### शिक्षा व न्यायनिवाडा

**कलम 43 :** संगणक किंवा संगणक व्यवस्थेस इजा (damage) पोहचवल्यास शिक्षा

उदा. परवानगीशिवाय प्रवेश, माहिती मिळवणे, व्हायरस सोडणे, नुकसान पोहचवणे इ.

**शिक्षा :** नुकसान भरपाईच्या रकमेस जबाबदार

**कलम 44 :** प्रमाणन अधिसत्तेला आवश्यक माहिती पुरवण्यास अपयशी ठरल्यास

- **शिक्षा :**

(a) प्रत्येक अपयशासाठी 1,50,000 रुपयांपर्यंत दंड

(b) वेळमर्यादेत माहिती न पुरवल्यास प्रत्येक दिवसासाठी 5000 रुपयांपर्यंत दंड

(c) लेख्यांची नोंदवही व अहवाल राखण्यात अपयश - प्रत्येक दिवसासाठी 10,000 रुपयांपर्यंत दंड

**कलम 45 :** अवशिष्ट शिक्षा (residuary penalty)

- स्वतंत्रपणे दंडाची रक्कम नमूद केली नसल्यास नुकसान भरपाई 25,000 रुपयांपर्यंत

**कलम 46 :** या कायद्याअंतर्गत न्यायनिवाडा करण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्याचा अधिकार केंद्र सरकारला असेल.

**कलम 47 :** नुकसान भरपाईचा आदेश देताना अधिसत्तेने खालील बाबी विचारात घ्याव्यात

(a) मोजणी शक्य असल्यास अयोग्य फायद्याच्या लाभाची रक्कम (unfair advantage)

(b) कर्तव्यच्युतीमुळे झालेला तोटा

(c) कर्तव्यच्युतीचे वारंवार स्वरुप

## प्रकरण 10

### सायबर अपील न्यायाधिकरण

**कलम 48 :** केंद्र सरकार या न्यायाधिकरणाची स्थापना करु शकेल.

**कलम 49 :** केंद्र सरकार या न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य नेमू शकतील.

**कलम 50 : अध्यक्षांची पात्रता –** तो उच्च न्यायालयाचा न्यायाधिश असावा किंवा त्यासाठी पात्र असावा किंवा यापूर्वी ते पद धारण करणारा असावा.

**कलम 51 : पदावधी** - 5/65 वर्ष

**कलम 52 : सेवाशर्ती** - अध्यक्ष व सदस्यांच्या सेवाशर्ती केंद्र सरकारने नमूद केल्याप्रमाणे

**कलम 53 : पद रिक्त होणे** - पद रिक्त होण्यापूर्वी ज्या टप्प्यावर कार्यवाही स्थगित होती तेथून पुढे चालू राहील.

**कलम 54 : राजीनामा व बडतर्फी**

**राजीनामा –** केंद्र सरकारकडे

**अध्यक्ष –** सरकारने दिलेल्या नोटीसीच्या तारखेपासून 3 महिन्यापर्यंत किंवा त्याचा उत्तराधिकारी येईपर्यंत किंवा त्याच्या पदाचा कार्यकाल संपेपर्यंत त्या पदावर राहू शकतो. सर्वोच्च न्यायालयाने शाबीत केलेल्या गैरवर्तवणूक व अकार्यक्षमतेच्या आधारे केंद्र सरकार पदावरुन दूर करेल.

**कलम 55 :** न्यायाधिकरणाची रचना ठरवणारे आदेश अंतिम असतील.

- न्यायाधिकरणाच्या रचनेत दोष असल्यास त्याची कार्यपद्धत बेकायदेशीर ठरणार नाही.

**कलम 56 :** केंद्र सरकार आवश्यक वाटतील इतक्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करेल व असे कर्मचारी अध्यक्षाच्या नियंत्रणाखाली काम करतील.

**कलम 57 : न्यायाधिकरणाकडे अपील :**

- नियंत्रण व निर्णय अधिकाऱ्याच्या आदेशाविरोधात 45 दिवसाच्या आत अपील करता येईल.
- निर्णय अधिकाऱ्याने पक्षकारांच्या संमतीने निर्णय दिला असल्यास अपील करता येणार नाही.
- न्यायाधिकरणाने अपील दाखल झाल्यापासून 6 महिन्याच्या आत शक्य तितक्या लवकर निकालासाठी प्रयत्न करावे.

**कलम 58 :** न्यायाधिकरणाची कार्यपद्धत ही न्यायालयीन कार्यवाही असेल तसेच त्यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील.

**कलम 59 :** अर्जदार स्वत: किंवा कायदेशीर प्रतिनिधीद्वारे न्यायाधिकरणापुढे उभे राहू शकतो.

**कलम 60 :** 'मुदत मर्यादा अधिनियम 1963' या अधिनियमाला लागू असेल

**कलम 61 :** या अधिनियमांतर्गत निर्माण होणारे गुन्हे 'दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाहीत.

**कलम 62 :** न्यायाधिकरणाच्या आदेशाविरोधात तथ्य किंवा कायदेविषयक प्रश्नाबाबत 60 दिवसाच्या आत उच्च न्यायालयात अपील करता येईल. ही मुदत आणखी 60 दिवस वाढवता येवू शकेल

**कलम 63 : उल्लंघनाबाबत आपआपसांत समझोता :**
- या कायद्यांतर्गत झालेले उल्लंघन दोन्हीही पक्षकार आपआपसांत समझोता करुन मिटवून घेवू शकतात.
- त्यासाठी कायदेशीर दंडाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम आकारता येणार नाही.
- एखाद्या व्यक्तीने केलेले पहिले उल्लंघन ज्या तारखेस मिटवण्यात आले त्या तारखेपासून त्याच किंवा तशाच उल्लंघनासाठी वरील तरतूद लागू होणार नाही.

**कलम 64 : दंड अकारणे / दंड वसूल करणे**
- या काद्यांतर्गत आकारलेला दंड जमीनमहसूलाची थकबाकी म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडून वसूल केला जाईल.

## प्रकरण 11
### अपराध

**कलम 65 :** संगणक दस्तऐवजात हस्तक्षेप करणे
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत / 2 लाखांपर्यंत / दोन्ही

**कलम 66 :** संगणकाशी संबंधित बाबींना इजा पोचवणे
- **शिक्षा :** 2 वर्षांपर्यंत / 5 लाखांपर्यंत / दोन्ही

**कलम 66 (A) :** संदेशवाहन सेवामार्फत अपराधकारक संदेश
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत + दंड

**कलम 66 (B) :** गैरमार्गाने संगणक सामग्री मिळवणे
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत / 1 लाखांपर्यंत / दोन्ही

**कलम 66 (C) :** ओळखदर्शक गोष्टींची चोरी
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत / 1 लाखांपर्यंत दंड

**कलम 66 (D) :** तोतयेगिरीद्वारे फसवणूक
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत + 1 लाखांपर्यंत दंड

**कलम 66 (E) :** खाजगीपणाचे उल्लंघन
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत / 2 लाखांपर्यंत / दोन्ही

**कलम 66 (F) :** सायबर दहशतवाद
- **शिक्षा :** आजीवन कारावास

**कलम 67 :** अश्लील मजकूर विद्युत स्वरुपात पाठवणे
- **शिक्षा :** पहिल्या गुन्ह्यास : 3 वर्षांपर्यंत + 5 लाखांपर्यंत
  दुसऱ्या व त्यानंतरच्या गुन्ह्यास :
  5 वर्षांपर्यंत + 10 लाखांपर्यंत

**कलम 67 (A) : लैंगिक भावना उद्योपित करणे**
- **शिक्षा :** पहिल्या गुन्ह्यास : 5 वर्षांपर्यंत+ 10 लाखांपर्यंत
  दुसऱ्या व त्यानंतरच्या गुन्ह्यास :
  7 वर्षांपर्यंत + 10 लाखांपर्यंत

**कलम 67 (B) :** आश्लिल चित्रण प्रसिद्ध करणे
- **शिक्षा :** पहिल्या गुन्ह्यास : 5 वर्षांपर्यंत+ 10 लाखांपर्यंत
  दुसऱ्या व त्यानंतरच्या गुन्ह्यास :
  7 वर्षांपर्यंत + 10 लाखांपर्यंत
  या कलमांतर्गत 18 वर्षाखालील व्यक्तींना लैंगिक भावनेसाठी उद्योपीत करणे हा गुन्हा आहे.

**कलम 67 (C) :** माहितीचे जतन व धारणा
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत + दंड

**कलम 68 :** निदेश देण्याचा नियंत्रकाचा अधिकार
- **शिक्षा :** 2 वर्षांपर्यंत / 1 लाखांपर्यंत दंड

**कलम 69 :** माहिती मध्येच रोखून ठेवणे
- **शिक्षा :** 7 वर्षांपर्यंत + दंड

**कलम 70 :** संरक्षक यंत्रणा
संरक्षण माहितीचे उल्लंघन केल्यास शिक्षा :
10 वर्षांपर्यंत + दंड

**कलम 71 :** चुकीच्या माहितीबद्दल शिक्षा
2 वर्षांपर्यंत + 1 लाखापर्यंत दंड

**कलम 72 :** विश्वासर्हता व गुप्ततेचा भंग
- **शिक्षा :** 2 वर्षांपर्यंत / 1 लाखापर्यंत / दोन्ही

**कलम 72 (A) :** कायदेशीर कराराचा भंग करुन माहिती उघड करणे
- **शिक्षा :** 3 वर्षांपर्यंत / 5 लाखापर्यंत / दोन्ही

**कलम 73 :** चुकीचे (Digital sign) प्रमाणपत्र प्रसिद्ध करणे (वर्गणीदाराकडून)
- **शिक्षा :** 2 वर्षांपर्यंत / 1 लाखापर्यंत / दोन्ही

**कलम 74 :** कोणत्याही अवैध कारणासाठी अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्र निर्माण करणे किंवा प्रसिद्ध करणे
- **शिक्षा :** 2 वर्षांपर्यंत / 2 लाखापर्यंत / दोन्ही

**कलम 75 :** हा अधिनियम भारताबाहेरील अपराधाला सुद्धा लागू होतो.

**कलम 76 :** संगणक, फ्लॉपी इ जप्त करण्याचा अधिकार

**कलम 78 :** अपराधाचे अन्वेषण करण्याचा अधिकार
- पोलिस निरिक्षकापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्याला अधिकार.

## प्रकरण 12

### मध्यस्थ जबाबदार नसतील

**कलम 79 :** मध्यस्थ जबाबदार नसतो.

## प्रकरण 13

### संकीर्ण

**कलम 80 :** पोलिस अधिकाऱ्यांना झडती घेण्याचा तसेच वारंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार असणे

**कलम 81 :** हा कायदा इतर कायद्यांच्या तुलनेत वरचढ आहे.

**कलम 81 (A) :** हा अधिनियम धनादेशास लागू होत नाही.

**कलम 82 :** न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, सदस्य आणि इतर अधिकारी भारतीय दंड संहितेच्या कलम 21 प्रमाणे लोकसेवक असतील.

**कलम 83 :** केंद्र सरकारला निर्देश देण्याचा अधिकार

**कलम 84 :** सद्भावनापूर्वक कृतीस संरक्षण असेल

**कलम 85 :** कंपनीने केलेले अपराध - सारख्याच तरतूदी लागू असतील.

**कलम 86 :** या कायद्याच्या अंमलबजावणीपासून 2 वर्षांच्या आत या कायद्यातील अडचणी दूर करण्याचा केंद्र सरकारला अधिकार असतो.

**कलम 87 :** केंद्राला नियम तयार करण्याचे अधिकार

**कलम 88 :** केंद्र सरकार सल्लागार समितीची स्थापना करु शकेल

**कलम 89 :** नियमन करण्याचे नियंत्रकाचे अधिकार

**कलम 90 :** नियम तयार करण्याचे राज्य शासनाला अधिकार

■●■